**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश.**

नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्राच्या १५२ गावांसाठीची विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २३ गावांच्या अंतरिम विकास योजना क्षेत्रासाठी लागू करणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- ६ जानेवारी २०२०.**

**निदेश**

**क्रमांक :-टिपीएस-१७१७/२७५०/प्र.क्र.९१/१९/नवि-१२,**

ज्याअर्थी, शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) च्या कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्राच्या (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसुचित क्षेत्र" असा करण्यात आला आहे) २३ गावांसाठीची अंतरिम प्रारुप विकास योजना त्याच्या विकास नियंत्रण नियमावलीसह शासन नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.टिपीएस-१२१५/२४५/प्र.क्र.३३२/१६/एसएम/नवि-१२ दि.२७/४/२०१७ च्या अधिसूचनेन्वये मंजूर झाली असून ती दि.२७/५/२०१७ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार उक्त अधिसूचित क्षेत्राच्या उर्वरित १५२ गावांची विकास योजना त्याच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीसह शासन नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.१७१७/सं.क्र.२७५०/प्र.क.९१/२०१९/नवि-१२, दि.१६/९/२०१९ च्या अधिसूचनेन्वये मंजूर केली असून, ती दि.१६/१०/२०१९ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचित क्षेत्राच्या संपूर्ण क्षेत्रासाठी एकसमान विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली लागू करणे उचित होईल आणि याकरीता सदर नियमावली तात्काळ प्रभावाने लागू करणेसाठी उक्त अधिनियमाच्या कलम १५४ अन्वये शहर व औद्योगिक विकास महामंडळास (सिडकोस) निदेश देणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

त्याअर्थी, आता सदर विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली उक्त अधिसूचित क्षेत्राच्या २३ गावांकरीता तात्काळ प्रभावाने लागू करण्यासाठी शासन शहर व औद्योगिक विकास महामंडळास (सिडको) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४(१) अन्वये खालीलप्रमाणे निदेश देत आहे.

**निदेश**

नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्राच्या १५२ गावांसाठीची शासन नगर विकास विभागाची अधिसूचना क्र.टिपीएस-१७१७/सं.क्र.२७५०/प्र.क्र.९१/२०१९/नवि-१२, दि.१६/९/२०१९ अन्वये मंजूर झालेली विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्राच्या उर्वरित २३ गावांच्या अंतरिम विकास योजना क्षेत्रासाठी लागू करण्यासाठी शासनाने क्र.टिपीएस-१७१७/२७५०/प्र.क्र.९१/नवि-१२, दि.६/१/२०२० अन्वये २३ गावांच्या अंतरिम विकास योजनेमध्ये सुधारणा करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) अन्वये सूचना प्रसिध्द केलेली आहे. सदर सुधारणाद्वारे प्रस्तावित असलेली विकास नियंत्रण नियमावली तात्काळ प्रभावाने लागू करण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,**

**(संजय बाणाईत)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :- माहितीसाठी व कार्यवाहीसाठी सादर.**

१) व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको), सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई

२) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३) सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण विभाग, बेलापूर, नवी मुंबई.

४) सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग शाखा, जि. रायगड.

५) निवडनस्ती (नवि-१२)